**पाहिजेत**
**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**शैक्षणिक**
**शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश**
इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश
ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय
पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७५ वा | शुक्रवार, दि. १२ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# दिल्लीत देशव्यापी आंदोलन छेडणार; पुण्यातून अभिजीत दिपकेंचा इशारा



## शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा न दिल्यास पुन्हा जंतरमंतर

## विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** परीक्षा व्यवस्थेतील गैरव्यवस्था, पेपरफुटी, निकालातील विलंब आणि भरती प्रक्रियेतील अडचणी याविरोधात विद्यार्थ्यांनी आता रस्त्यावर उतरून आवाज उठविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

तसेच शुक्रवारपर्यंत राजीनामा न झाल्यास २० जून रोजी दिल्लीत देशव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कॉक्रोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कॉक्रोज जनता पार्टीचे आंदोलन झाले त्यावेळी सोनम वांगचुक, विद्यापीठातील आंबेडकरी संघटनेचे प्रतिनिधी, ॲड. असिम सरोदे, नितीन अंधळे, राहुल डंबाळे आणि विविध संघटनेचे प्रतिनिधी आणि विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

दिपके म्हणाले, पेपरफुटीच्या घटनांवर बोलताना 'पेपर फुटले, मात्र कोणीही राजीनामा द्यायला तयार नाही. देशातील एक कोटी विद्यार्थ्यांचे भविष्य महत्त्वाचे की एका मंत्र्याचे पद ?' असा सवाल उपस्थित करण्यात आला. तसेच परीक्षा आणि भरती प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप करण्यात आला.

सोनम वांगचुक म्हणाले, पुण्याचे पर्यावरण संवर्धनातील सहभागाचे कौतुक करताना त्यांनी शहरातील नदी संवर्धन, वृक्ष संरक्षण आणि पर्यावरणाशी संबंधित विविध जनआंदोलनांचा उल्लेख केला. पुणे आणि महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये सामाजिक प्रश्नांबाबत असलेली जागरूकता आशादायक आहे. शिक्षण व्यवस्थेतील आणि परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्यासाठी सत्याच्या मार्गाने संघर्ष करण्याची गरज आहे.

**'पंचसूत्री' दिपक च्या मागण्या**

आंदोलनकर्त्यांनी जाहीर केलेल्या 'पंचसूत्री' मागण्यांमध्ये पेपरफुटी झाल्यास विद्यार्थ्यांना १० हजार रुपयांची भरपाई, परीक्षा पुढे ढकलल्यास नुकसानभरपाई, निकाल उशिरा लागल्यास प्रतिमहिना आर्थिक मदत, भरती प्रक्रियेदरम्यान विशेष गाड्यांची व्यवस्था, ७२ तासांच्या आत पर्यायी परीक्षेची तारीख जाहीर करणे, उत्तरपत्रिका प्रत्यक्ष तपासणी, वयोमर्यादेत सवलत आणि परीक्षा व्यवस्थेचे स्वतंत्र ऑडिट आदी मागण्यांचा समावेश अभिजीत दिपके यांनी केला.

**संविधानाच्या बाजूने उभे राहणारे लोक अराजक कसे**

मुख्यमंत्री यांनी आंदोलनकर्त्यांना 'अराजक तत्त्वे' संबोधल्याच्या वक्तव्यावरही प्रतिक्रिया देण्यात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मानणारे आणि संविधानाच्या बाजूने उभे राहणारे लोक अराजकवादी कसे असू शकतात?' असा प्रश्न दिपके यांनी उपस्थित केला.

**विद्यापीठ आंदोलनमय**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी गुरुवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात कॉक्रोच जनता पार्टी (CJP)च्या वतीने आंदोलन करण्यात आले. मात्र आंदोलनादरम्यान काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याने परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली. या आंदोलनाचे नेतृत्व अभिजित दिपके यांनी केले. विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन पार पडले. विद्यापीठ प्रशासनाने काही अटी व शर्तींसह आंदोलनास परवानगी दिली होती. आंदोलनात मोठ्या संख्येने युवक-युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलकांनी "नरेंद्र मोदी उत्तर द्या", "विद्यार्थ्यांना न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आली होती.

## मोहरमनिमित्त 21 ते 26 जूनपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहरम कमिटी सोलापूरच्या वतीने मोहरमनिमित्त 21 ते 26 जून या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, ची माहिती कमिटीचे अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोहरम सणानिमित्त 12 जून रोजी मोहरम कमिटी मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन बारा इमाम चौक येथील मोहोळकर कॉम्प्लेक्समध्ये होणार आहे.

21 ते 26 जून या कालावधीत कमिटीच्या नेतृत्वाखाली पंजांच्या शानदार मिरवणुका काढण्यात येणार आहेत. याअंतर्गत 21 जून रोजी सायंकाळी सात वाजता साखर पेठ रंगा चौक येथून पीर बडे मुस्लिमची (प्रथम मानाचा पंजा) मिरवणूक काढण्यात येणार आहे.

22 जून रोजी सायंकाळी पाच वाजता दुर्वेश मस्जिद शनिवार पेठ येथून पीर छोटे अब्बासअली पंजाची मिरवणूक निघेल. 23 जून रोजी रात्री नऊ वाजता मराठा वस्ती येथून पीर इमाम कासिम पंजाची तसेच टिळक चौक परीट गल्ली येथून पीर इमामे कासिम पंजाची मिरवणूक काढण्यात येईल. याशिवाय शनिवार पेठ तालीम जिंदाशाह मदार मोहल्लाच्या वतीने पीर इमाम कासिम पंजाची व रात्री आठ वाजता बारा इमाम चौक अहमद अली शाह पटांगण येथून पीर शहीदे आझम पंजाची मिरवणूक निघेल.

24 जून रोजी रात्री नऊ वाजता समाचार चौक येथून पीर छोटे मौलाली पंजाची, विजापूर वेस्ट डॉक्टर झाकीर हुसेन चौक येथून रात्री अकरा वाजता घोडेपीर पंजाची ताबूत निघेल. रात्री बारा वाजता कुंभार 20 भुसार गल्ली येथून पीर बडे मौलाली 'मुशकिल कुशा' पंजाची मिरवणूक तसेच बाळी वेस येथून पीर बडे अकबर अली पंजाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. मंगळवार पेठ पोलीस चौकीजवळ पीर मौलाली व पीर अकबर अली यांची भेट होऊन तिन्ही पंजांची संयुक्त मिरवणूक काढण्यात येईल.

25 जून रोजी रात्री दहा वाजता बेगम पेठ मस्जिद लगत असलेल्या पीर हुसेन बाशा नाले हैदर इमामे हुसेन पंजाची मिरवणूक, रात्री बारा वाजता बेगम पेठ बडी बाणेकरी तालीम येथून पीर बडे इमाम हुसेनी पंजाची मिरवणूक तसेच रात्री साडेअकरा वाजता रविवार पेठ येथून पीर नालसाहेब पंजाची मिरवणूक (पान 2 वर..)

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करावेत-जिल्हाधिकारी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील गार अकोले परिसरात झालेल्या अतिवृष्टी व वादळी पावसामुळे केळी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला.या पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. व कृषी तसेच महसूल विभागाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करून अहवाल सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, तालुका कृषी अधिकारी चंदन, नायब तहसिलदार विजय कवडे, नायब (पान 2 वर..)








## संपादकीय

# राजकीय जंतर मंतर

अमेरिका स्थित भारतीय तरुण अभिजीत दिपके यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'चे पहिले रस्त्यावरील आंदोलन राजधानी नवी दिल्लीमध्ये जंतरमंतर येथे पार पडले. या नव्या पार्टीच्या निमित्ताने आणि जंतर-मंतरवरील या आंदोलनाच्या निमित्ताने विविध प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. आधुनिक काळामध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून विचार घराघरात आणि मनामनात पोहोचवण्याचे नवे तंत्रज्ञान विकसित झाले आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजित दिपके यांनी सोशल मीडियाच्या विविध माध्यमांचा वापर करून या पार्टीर्चा विचार आणि काम तरुणांपर्यंत पोहोचवण्याचे तंत्र अवलंबले आहे. त्याचाच परिणाम म्हणून जंतरमंतर येथे आंदोलनाला चांगला प्रतिसाद मिळाला आणि त्यामध्ये तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. दिपके यांच्या या आंदोलनाबाबत उलट सुलट मते व्यक्त करण्यात येत असली, तरी भारतीय लोकशाही राजकारणात खळबळ माजवणारी एक घटना घडत आहे हे वास्तवही नाकारून चालणार नाही.

विविध राजकीय पक्षांनी याबाबत कोणत्या भूमिका घेतल्या आहेत हेसुद्धा महत्त्वाचे ठरते. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने हे आंदोलन होऊ दिले, त्यांनी कोणत्याही प्रकारची दडपशाही केली नाही. त्यामुळे हे आंदोलन शांततेत पार पडले. सर्व माध्यमांनीसुद्धा या आंदोलनाला प्रसिद्धी दिली. देशातील मुख्य विरोधी पक्ष असलेल्या कॉंग्रेस पक्षाने या आंदोलनापासून बाजूला राहणेच पसंत केले. कारण त्यांच्या मते, कॉकरोच जनता पार्टी हे आम आदमी पक्षाचे ब्रेन चाइल्ड आहे. पण कॉंग्रेसचे मित्रपक्ष असलेले तृणमूल कॉंग्रेस, समाजवादी पार्टी, आम आदमी पार्टी, कम्युनिस्ट पक्ष आणि ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने मात्र या आंदोलनाला पाठिंबा दिला. अभिजीत दिपके यांच्या या पार्टीर्चे आंदोलन जर यशस्वी झाले आणि भविष्य काळात या नवीन पार्टीर्ने राजकीय स्पेस निर्माण केली, तर ती स्पेस विरोधी पक्षांची असणार आहे याची कल्पना फक्त कॉंग्रेस पक्षालाच आली आणि इतर विरोधी पक्षांना आली नाही म्हणूनच त्यांनी केवळ सत्ताधारी भाजपाला विरोध करण्याच्या भूमिकेतून कॉक्रोच जनता पार्टीर्ला पाठिंबा दिलेला दिसतो. अर्थात, देशातील राजकीय पक्षांची ही भूमिका असली तरी कोक्रोच जनता पार्टीर्ने या आंदोलनाच्या निमित्ताने जे मुद्दे मांडले त्याचा विचार सरकारला करावाच लागणार आहे. सध्या तरी या पक्षाने युवकांचे प्रश्न विशेषतः शैक्षणिक प्रश्न समोर घेतले आहेत. नीट परीक्षेमध्ये झालेले पेपरफुटीचे प्रकरण त्यांनी लावून धरायचे ठरवलेले दिसते. त्यातून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाची मागणी आहे.

आम्ही अद्याप निवडणुकीच्या राजकारणात उतरण्याचा विचार केलेला नाही अशी भूमिका जरी जाहीर करण्यात आली असली, तरी आगामी कालावधीमध्ये विचार होऊ शकतो. अद्याप लोकसभा निवडणुकीला तीन वर्षाचा कालावधी बाकी असल्याने तोपर्यंत ह्या पार्टीर्चा बोलबाला अशाच प्रकारे कायम ठेवण्याचे आव्हानही पक्षाला पेलावे लागणार आहे.

अजून या पक्षाने निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली नाही किंवा संस्था व संघटना म्हणूनही नोंदणी केलेली नाही. सोशल मीडियाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या या पार्टीर्चा विचार किती गंभीर आहे हे येत्या काही कालावधीमध्ये निश्चित होऊ शकतो.नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका या काही देशांमध्ये तरुणाईच्या अशा उद्रेकामुळे सत्तांतर झाले होते, याची कल्पना भारतातही विद्यमान सत्ताधार्यांना असणार आहे. पण भारतासारख्या लोकशाही देशामध्ये फक्त निवडणुकीच्या माध्यमातूनच सत्तांतर होऊ शकत असल्याने लोकसभा निवडणुकीनंतरच पक्षाची ताकद आणि लोकांचा पाठिंबा लक्षात येणार आहे. करोडो लोकांनी या पक्षाचे सदस्यत्व घेतले आहे. पण आधुनिक तरुणाईला जे नावीन्याचे वेड आहे त्यातूनच अशा कोणत्याही नवीन चळवळीला पाठिंबा देण्याकडे त्यांचा कल आहे का हेसुद्धा पहावे लागते.

पान १ वरून

## मोहरमनिमित्त 21 ते 26 जूनपर्यंत...

काढण्यात येणार आहे.

26 जून रोजी पहाटे चार वाजता शनिवार पेठ दुर्वेश मशीद येथून पीर इमाम हुसेन पंजाची मशालीसह मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी सहा वाजता दादा पीर पंजाची मिरवणूक सपार बांधव परिवाराच्यावतीने काढण्यात येणार आहे. त्यानंतर इमामे कासिम पंजे जमखंडीवाल्यांची पंजाची मिरवणूक निघेल. सकाळी सात वाजता इमामी कासिम पंजे नालबंद यांच्या परिवाराच्या पंजाची मिरवणूक, त्यानंतर मंगळवेढा तालीम येथून इमामे हुसेन

साहेबांच्या पवित्र 72 कुटुंब अहले हरम पंजाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. याच दिवशी दुपारी दोन वाजता पानगल मस्जिद शनिवार पेठ येथून मानाचे पीर इमामे हुसेनची मिरवणूक तसेच अन्य ठिकाणी देखील मिरवणूक काढण्यात येणार आहे. दुपारी साडेचार वाजता बारा इमाम चौक, मोहोळकर कॉम्प्लेक्स येथे साडी, महाप्रसाद व शरबत वाटप करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेला कमिटीचे सरचिटणीस हाजी शकील शब्बीर मौलवी, खजिनदार शाह इकबाल म. हनीफ दुर्वेश आदी उपस्थित होते.

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे...

तहसिलदार अनिल ठोंबरे, उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, मंडल अधिकारी भगवान मुंडे, तलाठी बाळासाहेब कांबळे, वैभव पाटील, बोऱ्हाडे तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी संबंधित कृषी अधिकारी व महसूल विभागाला तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे निर्देश दिले. अतिवृष्टी व वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची योग्य नोंद घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. शेतकऱ्यांनी धीराने परिस्थितीला सामोरे जावे व प्रशासनाकडून आवश्यक ती मदत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आतापर्यंत ८० टक्के पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित पंचनामे तातडीने करण्यात येतील. जिल्ह्यात प्राथमिक माहितीनुसार सुमारे ६ हजार हेक्टर क्षेत्रावरील शेती पिकाचे नुकसान झालेले आहे, असे सांगितले.

**शेतकऱ्यांची मागणी –**

माढा तालुक्यातील गार अकोले परिसरात झालेल्या अतिवृष्टी व वादळी पावसामुळे केळी व डाळिंब पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या परिसरात ३०० ते ४०० एकरांवर केळीची लागवड झाली असून प्रत्येकी एकरी २.५० ते ३ लाख रुपये खर्च झाला आहे. अतिवृष्टी व वादळी पावसामुळे फळबागांचे १०० टक्के नुकसान झाले असून शेतकऱ्यांनी तातडीने नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी शेतकरी किसन देवकते, प्रकाश केचे, धनंजय वाळेकर, वामन देवकाते व अशोक केचे यांच्या शेतातील नुकसानीची पाहणी करून त्यांच्याशी संवाद साधून धीर दिला.

# संयमीरत्न विजयसिंह मोहिते पाटील



आयुष्यात उद्भवणाऱ्या संकटांना शरण न जाता,स्वाभिमानाने सहकाराच्या माध्यमातून, शेतकरी कष्टकरी आणि गोरगरिबांच्या अखंड आयुष्याचे कल्याण करणारे, तर कर्तुत्वाचे सर्वोच्च शिखर निर्माण करणारे, अहोरात्र कष्ट करून, माळशिरस तालुक्याच्या ओसाड माळरानावर, सहकाराचे साम्राज्य निर्माण करणारे, सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या विचारांची शिदोरी घेऊन, जनविकासासाठी रात्रंदिवस एक करणारे, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री, दूरदृष्टीचे व्यक्तिमत्व मा.श्री.विजयसिंह मोहिते पाटील तथा विजयदादा...

असीम धैर्य, परिस्थितीचे अचुक मुल्यमापन, प्रबळ इच्छाशक्ती, जनतेवर जीवापाड प्रेम करणारा नेता तर लोककल्याणकारी ध्येयधोरणांची पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणी करणारे नव्या विकासाचे शिल्पकार अतुलनीय संयमी रत्न, राज्याच्या राजकीय रणांगणातील संयमी योद्धा म्हणून राज्याचे जेष्ठ नेते माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिमे-पाटील यांचेकडे पाहिले जाते.

सर्व प्रकारच्या सामाजिक उन्नतीची गुरुकिल्ली म्हणजे राजकिय शक्ती होय. ज्यांना अंतकरणपुर्वक समाजसेवा करायची असेल तर त्यांना राजकारणासारखे दुसरे सोयीस्कर माध्यम नाही! कारण लोकप्रतिनिधीच सभागृहात जनकल्याणाच्या, विकासाचे प्रश्न मांडू शकतात व त्यांच्या समस्या सोडवू शकतात. तसे पाहिले तर राजकारणातुनच समाजसेवा केली जाते आणि समाजकारणातूनही समाजसेवाच केली जाते. माध्यम राजकारण असो अथवा समाजकारण असो उद्देश मात्र एकच समानसेवा, समाजसेवा आणि जनसेवा!

मानवता हाच खरा धर्म, त्यांचा विकास करणे हेच आमचे खरे कर्म समजत, विजयदादांनी विकास कार्यावर प्रबळ निष्ठा ठेवत, अखंड आयुष्य पणाला लावले. सहकार क्षेत्र असो, शैक्षणिक क्षेत्र असो, कला, किंवा सांस्कृतिक असो, किंवा क्रीडा असो अशा विविध क्षेत्राच्या माध्यमातून, कायार्चा आलेख गगनाला भिडवला. राज्याच्या राजाकिय पटलावरही विजयवादांनी कतृत्ववान, कायार्चा ठसा उमटवला आहे. अफाट निर्णय क्षमता, सुसंस्कृत राजकारणी, कल्पक विचारसरणी, उत्कृष्ठ स्मरण शक्ती, जनविकासाबद्दल असणारी आत्मीयता यामुळे विजयदादा राजकिय पटलावर आदराचे नेतृत्व ठरले आहे.

लोकशाही ही सर्वश्रेष्ठ प्रणाली आहे. तीच्या माध्यमातून लोकांच्या आयुष्यात विकास कामांचा प्रकाश पेरायचा असतो आणि तेच कार्य दादांनी केले आहे.

राजकीयसारीपाठाचा खेळ खूप अवघड आहे. जनतेच्या आयुष्याच सोने करणाऱ्या नेतृत्वांना, अनेकदा विरोधक मंडळी, अडचणीत आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असतात? लोकशाहीला कलंक लावण्याचा प्रयत्न केला जातो ? निवडणूक रणांगणात आरोपांचे सुरंग लावले जातात. तर अनेकदा स्वःपक्षातील अदृश्य विरोधकांकडून, अदृश्य हल्ले केले जातात हे जनतेपासून लपले नाही.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचा राजकीय प्रवास, अकलूज ग्रामपंचायतीचे सरपंच पदापासून सुरू झाला होता. अनेकवेळा आमदार, खासदार, विविध खात्यांचे मंत्री, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास अविस्मरणीय आहे. या प्रवासामध्ये स्वपक्षातील असो किंवा विरोधक असो ते विजयदादांना आपल्या हक्काच माणूस म्हणून समजत होते आणि समजतात.अप्रतिम आयुष्य लोककल्याणाच्या सेवेसाठी अर्पण करणारे, त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारे,अखंड महाराष्ट्राच्या हृदयातील हसतमुख संयमीरत्न राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.श्री विजयसिंहजी मोहिते पाटील तथा दादासाहेब यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा....

**– विलास गायकवाड,** अकलूज

# कुंभार समाजातील गुणवंतांना आवाहन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :–** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने इयत्ता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कुंभार समाजातील इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत ७५ टक्केहून अधिक गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व समाजातील गुणवंत व्यक्तींचा सत्कार येणार आहे.गेल्या पंधरा वर्षापासून हा उपक्रम चालू असून आत्तापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे तरी शहर जिल्ह्यातील कुंभार समाजातील पालकांनी आपल्या पाल्याचे गुणपत्रिका व मोबाईल नंबर नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल निलम नगर येथील कार्यालयात पाठवावेत अथवा समक्ष द्यावे असे आवाहन नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले आहे.

**संपर्क –** विठ्ठल कुंभार (९४२३५२६०७१), चंद्रकुमार कुंभार (९३७००२०३९६)

# शेतातील ताली नांगरल्याच्या वादातून मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** करमाळा तालुक्यातील आळसुंदे येथे शेतातील ताली (मेढ) नांगरल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून मारहाणीची घटना घडली असून, करमाळा पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रमेश दिगंबर चव्हाण (रा. घोटी, ता. करमाळा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ६ जून रोजी सायंकाळी पावसानंतर आपल्या शेताची पाहणी करण्यासाठी ते व त्यांचा पुतण्या गेले होते. त्यावेळी शेतातील ताली नांगरलेली दिसल्याने संबंधितांना जाब विचारण्यासाठी ते आळसुंदे येथे गेले असता आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर एका आरोपीने लाकडी काठीने फिर्यादीच्या हातावर व कानाजवळ मारहाण केली, तर दुसऱ्या आरोपीने दगडाने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. भांडण सोडविण्यास आलेल्या फियार्दीच्या पुतण्यालाही दगडाने मारहाण करून जखमी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच फिर्यादीच्या पत्नीला शिवीगाळ व दमदाटी करण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी केशव दिरंगे, प्रकाश दिरंगे व एका महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमान्वये करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# बालपणाला मुक्त श्वास देऊया...

दि. १२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षाखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टीदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपकार्मुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते.

बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदभार्तील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.

बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते.

शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते.

बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो. या दिवसानिमित्त आयोजित केले जाणारे जनजागृती कार्यक्रम, चर्चासत्रे, शालेय उपक्रम आणि मोहिमा समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यास मदत करतात. मुलांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी सामूहिक बांधिलकी निर्माण करणे हे या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल.

दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओज्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## वात्रटिका

### बेताल शहाणे

बोलणारे शहाणे असतात
मुळीच असं काही नाही...
आपलंच तोंड म्हणून ते
बोलतात वाचाळ काही...
वाचाळवीर सगळीकडेच
आकलीचे तारे तोडतात...
पुन्हा पुन्हा तेच ते सारे
एकमेकांचे रेकॉर्ड मोडतात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ‘मेडिसिटी’द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार - मुख्यमंत्री फडणवीस



**क्लीव्हलँड, ओहायो (वृत्त सेवा):-** ह्यमेडिसिटीह्न ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दजार्ची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या ‘हील इन इंडिया’ या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले."

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे 250 एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दजार्ची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे 1.2 अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि 10,000 हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत.

मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, "क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे."

ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, "नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे."

आरोधन हेल्थ सिटीच्या संस्थापक आणि संचालक डॉ. सलोनी पटवर्धन म्हणाल्या, "जगातील सर्वोत्तम संस्थांना एकत्र आणून एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था निर्माण करणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आजचा हा टप्पा आम्हाला त्या ध्येयाच्या आणखी जवळ घेऊन गेला असून नवी मुंबईमध्ये जागतिक आरोग्य सेवा केंद्र स्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे."

महाराष्ट्र शासन या भागीदारीसाठी आवश्यक सहकार्य करेल तसेच लागू असलेल्या धोरणे आणि नियमांनुसार आवश्यक मंजुरी आणि परवानग्या मिळविण्यासाठी या समूहाला मदत करेल.

**नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विषयी**

नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी हा महाराष्ट्र शासन विकसित करत असलेला एक परिवर्तनकारी आरोग्य आणि जीवन विज्ञान उपक्रम आहे. भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक म्हणून विकसित होणारा हा प्रकल्प नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत उभारला जाणार आहे. जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा प्रदाते, संशोधक, शिक्षक, नवोन्मेषक आणि गुंतवणूकदार यांना एकत्र आणून क्लिनिकल उत्कृष्टता, संशोधन, नवोन्मेष आणि वैद्यकीय शिक्षणावर आधारित जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक आरोग्य सेवा केंद्र निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

# शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदभरतीसाठी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य वरीष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघाच्या वतीने शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदभरतीच्या प्रलंबित प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, दि. ८ जून २०२६ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, शासनाने सन २०१७ पासून आजतागायत शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदांची भरती केलेली नाही. त्यामुळे राज्यातील अनेक अनुदानित व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ही महत्त्वाची पदे रिक्त असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व क्रीडा विकासावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

शासनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदके मिळवायची आहेत, "खेलो इंडिया" सारख्या योजनांद्वारे क्रीडा संस्कृती रुजवायची आहे, मात्र खेळाडू घडविणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांचीच भरती करण्यास शासन उदासीन असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. "सरकारला मेडल हवे आहेत, पण ते घडवणारे प्रशिक्षित क्रीडा शिक्षक व शारीरिक शिक्षण संचालक नको आहेत," अशी तीव्र भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

महाविद्यालयांना शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल ही पदे बंधनकारक असताना आणि या पदांशिवाय मान्यता मिळत नसताना, शासनाने इतर सर्व विषयांच्या एकूण ५०१२ पदांना मान्यता दिली; मात्र शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदांना या भरती प्रक्रियेतून वगळण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून राज्यभरातील पीडित उमेदवार आणि कार्यरत शिक्षक विविध मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहेत. मोर्चे, धरणे आंदोलने, निवेदने आणि उपोषणाच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठवूनही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय होत नसल्याने आंदोलन नजीकच्या काळात अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.पदभरतीच्या प्रश्नाबाबत आवश्यक निर्णय घेणे व शासनापर्यंत वस्तुस्थिती पोहोचविण्यात दिरंगाई होत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

राज्यातील युवकांचे भविष्य, महाविद्यालयीन क्रीडा विकास आणि राष्ट्रीय स्तरावर सक्षम खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदांची भरती तातडीने करण्यात यावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही महासंघाने दिला आहे.

"क्रीडा क्षेत्र वाचवा – शारीरिक शिक्षण संचालक भरती करा!"

"रिक्त पदे तात्काळ भरा – विद्यार्थ्यांना न्याय द्या!"

डॉ.गणेश सिंहासने, अध्यक्ष– महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महाविद्यालय शारीरिक शिक्षण संचालक महासंघ.

"शासनाला पदके जिंकणारे खेळाडू हवे आहेत, पण ते घडवणारे शारीरिक शिक्षण संचालक नकोत, ही दुर्दैवी बाब आहे. २०१७ पासून प्रलंबित असलेली शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदभरती तात्काळ सुरू करून राज्यातील हजारो पात्र उमेदवारांना न्याय द्यावा, ही आमची शासनाकडे मागणी आहे."

"मी पीएसआय पदाची नोकरी सोडून क्रीडा क्षेत्रावरील प्रेम आणि विद्यार्थ्यांसाठी काम करण्याच्या उद्देशाने शारीरिक शिक्षण संचालक हे क्षेत्र निवडले. मात्र, शासनाने या पदभरतीबाबत घेतलेल्या नकारात्मक भूमिकेमुळे आमच्यासारख्या अनेक पात्र उमेदवारांच्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. खेळाडू घडविणाऱ्या पदांनाच न्याय मिळत नसेल, तर राज्याच्या क्रीडा विकासाला मोठा फटका बसणार आहे."

शिवछत्रपती पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय सायकलपटू यांची प्रतिक्रिया डॉ. संघर्ष शृंगारे यांनी दिली. राज्यातील पात्रता धारक शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल शासन निर्णयाच्या प्रक्रियेसाठी सतत पाठपुरावा करत आहेत. सदर संघर्षामध्ये राज्यातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे संघटनेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ विधीतज्ञ अँड. मिलिंद थोबडे यांची महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलवर सलग तिसऱ्यांदा निवड

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या निवडणुकीत ज्येष्ठ विधीतज्ञ अँड. मिलिंद थोबडे यांनी सलग तिसऱ्यांदा दणदणीत विजय संपादन करून उल्लेखनीय हॅट्रिक साधली आहे. त्यांच्या या यशाबद्दल राज्यभरातील वकील बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध बार संघटना, विधिज्ञ आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अँड. मिलिंद थोबडे यांनी आपल्या प्रदीर्घ विधीसेवेत कायदेविषयक सखोल अभ्यास, व्यावसायिक प्रामाणिकता, वकील बांधवांच्या प्रश्नांबाबतची बांधिलकी आणि प्रभावी नेतृत्व यामुळे विशेष स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या सलग तिसऱ्या विजयाने अधिवक्ता समाजाने त्यांच्या कार्यावर पुन्हा एकदा दृढ विश्वास व्यक्त केल्याचे मानले जात आहे.

याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना मंगळवेढा वकील संघाचे अध्यक्ष अँड. राजू शेख म्हणाले,

"अँड. मिलिंद थोबडे यांची सलग तिसऱ्यांदा झालेली निवड ही त्यांच्या नेतृत्वगुणांची आणि वकील समाजातील व्यापक स्वीकारार्हतेची पावती आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ राज्यातील अधिवक्त्यांना पुढील काळात अधिक प्रभावीपणे मिळेल, असा विश्वास आहे."

मंगळवेढा वकील संघाचे सदस्य अँड. डी. सी. जाधव यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले,

"वकील समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणारे आणि अधिवक्त्यांच्या हितासाठी कार्य करणारे नेतृत्व म्हणून अँड. मिलिंद थोबडे यांची ओळख आहे. त्यांचा विजय हा वकील समाजाच्या विश्वासाचा विजय असून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी हार्दिक शुभेच्छा."

मंगळवेढा वकील संघाचे सदस्य, तथा मधुसुधन उपभोक्ता व राष्ट्रीय मानव अधिकार हक्क महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष (वकील सेल) म्हणून कार्यरत असलेले अँड. अश्वनीत (नाना) चेळेकर यांनी सांगितले,

"अँड. मिलिंद थोबडे यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि अभ्यासू विधीतज्ञांचे कार्य आम्हा तरुण अधिवक्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या सलग तिसऱ्यांदा झालेल्या निवडीमुळे गुणवत्ता, निष्ठा आणि सातत्यपूर्ण कार्य यांना अधिवक्ता समाजाने दिलेली मान्यता अधोरेखित झाली आहे. न्यायव्यवस्था आणि अधिवक्ता हितसंरक्षणासाठी त्यांचे योगदान पुढील काळातही महत्त्वपूर्ण राहील."

**मंगळवेढा वकील संघाकडून अभिनंदन**









यावेळी अँड. अश्वनीत (नाना) चेळेकर यांनी अँड. थोबडे यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करताना न्याय, संविधानिक मूल्ये आणि अधिवक्त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी त्यांचे नेतृत्व अधिक बळकट होईल, तसेच सामाजिक माध्यमांवर विविध स्तरांतून अँड. मिलिंद थोबडे यांच्या विजयाचे स्वागत करण्यात येत असून वकील समाजामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# खटल्याच्या वादातून धमक्या; मुंबई हायकोर्टाच्या माजी न्यायाधीशांना लंडनमध्ये सुरक्षा

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):-** मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्या. गौतम पटेल आणि त्यांच्या लंडनस्थित कुटुंबीयांना मिळालेल्या जिवे मारण्याच्या धमक्यांची गंभीर दखल भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी घेतली आहे. या प्रकरणी त्यांनी ब्रिटनमधील भारताचे उच्चायुक्त पी. कुमारन यांच्याशी चर्चा करून आवश्यक सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणी केली.

सरन्यायाधीश सूर्यकांत सध्या ब्रिटन दौऱ्यावर असून, त्यांनी या विषयावर उच्चायुक्तांशी सविस्तर चर्चा केली. न्या. पटेल आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेबाबत योग्य ती पावले उचलली जातील, असे आश्वासन उच्चायुक्तांनी दिल्याचे समजते.

न्या. गौतम पटेल यांनी नुकतेच उघड केले की, त्यांच्या मुलीच्या लंडनमधील निवासस्थानी धमकीचे पत्र पाठविण्यात आले होते. या धमक्यांचा संबंध दाऊदी बोहरा समाजाचे आध्यात्मिक प्रमुख 'सैयदना' यांच्या उत्तराधिकार आणि अधिकारांशी संबंधित वादग्रस्त प्रकरणाशी असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणात न्या. पटेल यांनी २०२४ मध्ये महत्त्वपूर्ण निकाल दिला होता. त्यानंतरच त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना धमक्या येऊ लागल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय न्यायव्यवस्थेतील वरिष्ठ स्तरावरून या प्रकरणाची दखल घेतल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक

**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव ५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव ८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले १०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत) १२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा १८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत) २१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक २७) दुधावरील मलई २८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ २९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती ३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी ३९) घाई, गडबड ४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास ४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत) ५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

## सुडोकु - 275

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 6 | | 1 | | 9 | | 3 | 8 |
| | 9 | | 3 | 7 | 4 | | 6 | 2 |
| | 3 | | | | | 4 | | |
| | 2 | 7 | | 5 | | 9 | | 3 |
| 9 | | 5 | 4 | | | 6 | | |
| | 8 | | 9 | | 7 | | 5 | |
| 8 | | 1 | 2 | | 6 | | | |
| | | | | | 1 | 7 | 2 | 6 |
| | | | 7 | 4 | | | 9 | |

# संबंधित यंत्रणांनी रस्ते अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात - जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात ज्या ठिकाणी अपघातांचे प्रमाण अधिक आहे त्या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलीस विभाग यांनी रस्ते सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना करून रस्ते अपघात होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून रस्ते अपघातांना प्रतिबंध घालावा आणि प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्या अध्यक्षतेखाली रस्ता सुरक्षेबाबत आढावा बैठक पार पडली. यावेळी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपप्रादेशिक अकलूज अमरसिंह गवारे, अप्पर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक स्वप्निल कासार, सहायक पोलीस आयुक्त वाहतूक शाखा मच्छींद्र पंडीत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश सुधाकर चाटे, पोलीस निरीक्षक रविंद्रनाथ कृष्णा भंडारे, पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे तसेच महामार्ग सुरक्षा पथकाचे अधिकारी व संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन म्हणाले की, संबंधित सर्व यंत्रणांनी जिल्ह्याच्या ज्या राष्ट्रीय, राज्य व जिल्हा रस्त्यावर अपघात मोठ्या प्रमाणावर होत आहेत त्या ठिकाणी लाईटची सुविधा, गतीरोधक, चिन्हांकित बोर्ड व आपत्कालीन हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून द्यावेत. तसेच वाहतूक पोलीस यंत्रणेने माईक सिस्टीमचा वापर करून वाहनधारकांना वेळोवेळी अस्थिर वाहतूकीबाबत सूचना कराव्यात. वाहनचालकांची मद्यपान तपासणी नियमितपणे करावी, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी अपघात प्रवण क्षेत्रातील रस्त्यांची वेळोवेळी तपासणी करावी. रस्त्यांवरील दोष, अडथळे किंवा अपुरी सुविधा यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा ठिकाणी तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे.आरोग्य विभागाला अपघाताच्या ठिकाणी तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याचे व अपघातग्रस्त व्यक्तींना त्वरित उपचार करण्याचे सांगून

अपघातानंतरच्या ह्यगोल्डन अवरह्ण्मध्ये योग्य उपचार मिळाल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी म्हटले.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी स्पष्ट केले की, रस्ता सुरक्षा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. वाहन चालविताना वेगमयार्दा पाळणे, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे या बाबींचे पालन केल्यास अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी अपघाताच्या आकडेवारीसह केलेल्या उपाययोजनांचा आढावा बैठकीत सादर केला. वाहतूक नियंत्रण, मद्यपान तपासणी, वाहनधारकांना जनजागृती, तसेच महामार्गांवर गस्त वाढविणे यासंबंधी माहिती देण्यात आली. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी वाहन तपासणी मोहिमेची माहिती दिली.

# आ. अभिजित पाटील यांच्या जनता दरबारास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**माढा (कटूसत्य वृत्त):** माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजित पाटील यांच्या उपस्थितीत सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मतदारसंघातील विविध भागांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या, अडचणी व मागण्या आमदारांसमोर मांडल्या.

जनता दरबारात पाणीपुरवठा, वीज, महसूल, रस्ते, शेती, शासकीय योजनांचा लाभ तसेच स्थानिक विकासकामांशी संबंधित विविध विषयांवर नागरिकांनी निवेदने सादर केली. यावेळी आमदार अभिजित पाटील यांनी प्रत्येक नागरिकाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत आवश्यक त्या सूचना दिल्या.

मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या तत्काळ मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलपणे व जबाबदारीने काम करावे, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. जनतेशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी जनता दरबार हे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे मत उपस्थित नागरिकांनी व्यक्त केले.

यावेळी मतदारसंघातील विविध गावांतील शेतकरी, युवक, महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनता दरबाराच्या माध्यमातून लोकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांचे तातडीने निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले.

# ऋत्विज चव्हाण यांना राज्यस्तरीय 'सह्याद्री कला रत्न' पुरस्कार जाहीर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** चित्रकला आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सोलापूरचे युवा कलावंत ऋत्विज चव्हाण यांची प्रतिष्ठेच्या राज्यस्तारीय ह्यसह्याद्री कला रत्नह्ण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. नालंदा फाउंडेशनतर्फे विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान केला जातो.



पुण्यातील श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित विशेष समारंभात ऋत्विज चव्हाण यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरविण्यात येणार आहे. अमूर्त शैलीतील चित्रकला आणि उत्स्फूर्त लेखन या क्षेत्रांतील त्यांच्या उत्कृष्ट कायार्ची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या सोहळ्याला सुप्रसिद्ध सिनेअभिनेते सुनील नाना गोडबोले, मराठी चित्रपट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन धवणे पाटील, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच मराठी चित्रपट देऊळ बंद मधील बालकलाकार आर्या घारे यांचीही विशेष उपस्थिती असणार आहे.

नालंदा फाउंडेशनकडून विविध क्षेत्रांतील व्यक्तींकडून प्रस्ताव मागवून त्यांची निवड प्रक्रिया राबविण्यात येते. सामाजिक, सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील कायार्चा सखोल आढावा घेऊन उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान केला जातो.

ऋत्विज चव्हाण यांना जाहीर झालेल्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे सोलापूरच्या कला आणि साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मोफत हेल्थ चेकअप आणि ट्री प्लांटेशन - बी. एम. जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'असोशियन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्स सोलापूर' आणि 'महाराष्ट्र स्टेट पोलीस हाऊसिंग अँड वेल्फेअर कापोर्रेशनच्या संयुक्त विद्यमाने' मोफत हेल्थ चेकअप आणि ट्री प्लांटेशन' चे कार्यक्रम आज शुक्रवार 12 जून रोजी सकाळी नऊ वाजता आय पी एस अधिकारी व मॅनेजिंग डायरेक्टर एम.एस.पी.एच & डब्ल्यू. सी मुंबईचे अर्चना त्यागी मॅडम यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याचे अध्यक्ष बी. एम.जाधव यांनी सांगितले.



सदरहू कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्याचे कमिशनर एम. राजकुमार तसेच ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, चीफ इंजिनियर आर. एम. गोसावी आणि सुपरिंटेंडिंग इंजिनियर पी. आर. जाधव, ऋत्विक जयकर (डीन- सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर) हे उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मोफत आरोग्य शिबिर हे बांधकाम क्षेत्रातील कामगारांकरीता करीत असून ते अशोक चौक येथे असलेल्या पोलीस हेडक्वार्टर 308, रेसिडेंट कॉटर साईट, सिटी पोलीस पेट्रोल पंपाच्या शेजारी येथे सकाळी 09:00 ते दुपारी 12:00 वाजेपर्यंत चालणार असून या मोफत शिबिराचा लाभ जास्तीत जास्त बांधकाम कामगारांनी लाभ घ्यावा असे आवाहन सचिव संतोषकुमार बायस यांनी केले आहे.

'असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर सोलापूर' आणि 'एन्व्हायरोसेफ कन्सल्टंट' यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर, ट्री प्लांटेशन आणि सेफ्टी ओरिएंटेशन वर्कशॉप तसेच गुड हेल्थ स्टेशन कार्यक्रम करण्यात येणार आहे. त्याकरिता खास मुंबईवरून मॅनेजिंग डायरेक्टर एम.एस.पी.एच & डब्ल्यू. सी वरळीच्या अर्चना त्यागी (आयपीएस) या उपस्थित राहणार आहेत.

# पालकमंत्री गोरे यांच्या ठोस आश्वासनानंतर सोलापूर विकास मंचाचे आंदोलन संस्थगित

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या विविध प्रलंबित विकास प्रश्नांवर शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, पुनम गेट, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेले सोलापूर विकास मंचाचे आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती मंचाच्या वतीने देण्यात आली आहे.



आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूरचे पालकमंत्री मा. जयकुमार गोरे यांच्या समवेत सोलापूर विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक काल म्हणजे १० जानेवारी रात्री उशिरा पार पडली. यावेळी मंचाच्या सदस्यांनी सोलापूरच्या विविध विकास विषयांबाबत सविस्तर चर्चा करून शासनाने या प्रश्नांकडे गांभीयार्ने लक्ष देण्याची मागणी केली.

बैठकीदरम्यान पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले की, *सोलापूर विमानतळावरील विमानसेवा, नाईट लँडिंग सुविधा, आय. टी. पार्क, परिवहन बस सेवा, पाणीपुरवठा, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच इतर प्रलंबित विकास विषयांबाबत केंद्र व राज्य शासनाच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.तसेच काही बाबतीत आपण मुख्यमंत्री यांचे बरोबर या महत्त्वाच्या विषयांवर आपल्या संघटनेच्या शिष्टमंडळ बरोबर बैठक आयोजित करण्यात येईल अशी माहिती पालकमंत्री यांनी सदर बैठकीत शिष्टमंडळास दिली .

यासाठी सोलापूर विकास मंचाने शासनाला व प्रशासनासाठी थोडासा कालावधी द्यावा व तोपर्यंत नियोजित आंदोलन संस्थगित करावे, अशी विनंती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली. त्यांच्या या विनंतीचा मान राखत व सोलापूरच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे व मुख्यमंत्री व ते स्वतः या प्रश्नाबाबत पुढाकार घेणार आहेत या उद्देशाने सोलापूर विकास मंचाच्या वतीने शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी होणारे आंदोलन संस्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सोलापूर विकास मंचाने स्पष्ट केले की, सोलापूरच्या विकासाशी संबंधित प्रश्नांवर शासनाकडून ठोस कार्यवाही झाली तर मंच शासनास पूर्ण सहकार्य करेल. मात्र, दिलेल्या कालावधीत अपेक्षित प्रगती न झाल्यास पुढील आंदोलनात्मक भूमिका निश्चित करण्यात येईल.

या बैठकीस सोलापूर विकास मंचाचे सदस्य मिलिंद भोसले, केतन शहा, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, अ‍ॅड. दत्तात्रय अंबुरे, प्रा. प्रसन्न नाझरे, सुहास भोसले, आनंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# राज्यात मान्सूनपुर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमस प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूतीर्साठी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.


पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प व फऱ्या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. डॉ. किरण पाटील यांनी सांगितले की, लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**पशुपालकांना आवाहन**

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# स्मार्ट सिटीत कचरा उचलण्याबाबत दुर्लक्ष





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील कचरा उचलण्याबाबत महापालिकेचे नियोजन विस्कळीत झाल्याचे दिसून येत आहे. स्मार्ट सिटीतील सुंदर अशा सम्राट चौक परिसरातील एका पडीक हॉटेलच्या मागे रस्त्यावर व मागील बाजूस कचऱ्याचा ढिगारा अनेक दिवसांपासून पडून आहे.

सोलापूर शहरातील कचरा उचलण्याची समस्या ही शहरवासीयांचे कायमचे दुखणे झाली आहे. मागील वर्षात महापालिकेने अतिरिक्त घंटागाड्या घेतल्या आहेत. मात्र तरीही केवळ योग्य लक्ष न दिल्याने काही भागात अनेक दिवसांपासून कचरा पडून असल्याचे दिसून येते. असाच कचऱ्याचा ढीग सम्राट चौकातील एसटीच्या विभागीय कार्यालयासमोर असलेल्या तिरुपती हॉटेल लॉज या पडीक बिल्डिंगच्या मागील बाजूस अनेक दिवसांपासून पडून आहे. संबंधित ठिकाणचा कचरा पाहिला असता तो सुमारे 15 दिवस ते महिनाभरापासून उचलला गेला नसल्याचे दिसून येते. या भागात पडीक लॉज च्या शेजारी असलेल्या रस्त्यावर व त्याच्या पाठीमागील बाजूस मोठ्या प्रमाणात कचरा, राडारोडा साठला आहे. याच कचऱ्यावर म्हशी, कुत्री अशी जनावरे खाण्यासाठी येतात. या रस्त्यावरून जवळपास दोन-तीन अपार्टमेंट व नगर असा रहिवास आहे. लोकांनी दिलेल्या माहितीनुसार या भागात 60 ते 100 कुटुंबे राहतात. मात्र त्यांच्या प्रवेशाच्या रस्त्यावरच प्रचंड मोठा कचरा पडलेला आहे. दोन दिवसा खाली पडलेल्या पावसाचा ओलावा त्या कचऱ्यात साठल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंध येत आहे. याबाबत तक्रारी काही लोकांनी केल्या. स्थानिकांनी म्हटल्याप्रमाणे सम्राट चौक ते शिवाजी पुतळा परिसराचा रस्ता स्वच्छ करण्यासाठी जेव्हा महापालिकेचे लोक येतात, तेव्हा ते देखील आपला कचरा याच ठिकाणी टाकतात. नागरिकांनी वारंवार सांगूनही असा प्रकार घडत आहे. ही व्यवस्था सोलापूरसारख्या स्मार्ट सिटीसाठी निश्चितच चांगली नाही.

काही महिन्यांपूर्वी महापालिकेने स्वच्छता मोहीम राबवताना जिथे वारंवार कचरा पडून असतो, अशा ठिकाणांची स्वच्छता करून तेथे "स्वच्छोबा प्रसन्न " असे रंगवण्याची मोहीम काढली होती. ती मोहीम या ठिकाणी राबवली गेली होती का हा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच आता ती मोहीम पून्हा चालू करण्याची गरज आहे.

घंटागाड्या नागरिकांच्या घरातून कचरा गोळा करतात मात्र जो कचरा असा रस्त्यावर पडलेला आहे, तो उचलण्यासाठी काही व्यवस्था आहे का नाही ? असल्याच तिचे या ठिकाणी दुर्लक्ष कसे काय हा मोठा प्रश्न आहे. महापालिका प्रशासनाने या ठिकाणचा कचरा तातडीने उचलावा अशी मागणी होत आहे.

# उपजिल्हाधिकारी देशमुख यांच्याकडून मतदानाच्या पहिल्या टप्प्याचे प्रशिक्षण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेच्या प्राथमिक टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले. या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर तसेच सर्व तहसीलदार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी मतदान प्रक्रियेची संपूर्ण माहिती दिली. या निवडणुकीसाठी 6 मतदान केंद्रे, 2 उमेदवार आणि एकूण 616 मतदार निश्चित करण्यात आले आहेत. निवडणूक जाहीर व आचारसंहिता दिनांक 18 मे 2026 रोजी लागू झाली असून मतदान दिनांक 18 जून 2026 सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत होईल. मतमोजणी 22 जून 2026 रोजी पार पडणार आहे.मतदान केंद्रांवर मतदारांची यादी पुरविण्यात येणार असून अधिकारी व कर्मचारी यांनी ती नीट तपासून खात्री करावी. नगरपंचायत व नगरपरिषद केंद्रांवर मतदारांची ओळख पटविण्यासाठी गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित राहतील.

मतदान अधिकारी नियुक्ती :क्षेत्रीय अधिकारी – उपजिल्हाधिकारी मतदान केंद्राध्यक्ष – तहसिलदारमतदान अधिकारी क्र.1 – नायब तहसिलदारमतदान अधिकारी क्र.2 – अव्वल कारकूनमतदान अधिकारी क्र.3 – अव्वल कारकून/लिपिकमतदान कर्मचारी – शिपाईस्थानिक स्वराज संस्थेचे मुख्याधिकारी व गटविकास अधिकारी यांची मतदार ओळख पटविण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे.



**मतदान पद्धत :** मतदारांना उमेदवाराच्या नावासमोर पसंतीक्रम अंकात लिहावा लागेल. हा क्रमांक मराठी, इंग्रजी, रोमन किंवा भारतीय भाषांतील अंकात लिहिता येईल, परंतु शब्दात लिहिता येणार नाही. भारत निवडणूक आयोगाने पुरविलेला जांभळा स्केचपेन वापरूनच मतदान करावे. प्रत्येक मतपत्रिकेला काउंटर फाईल असेल ज्यावर मतदार यादी भाग क्रमांक, अनुक्रमांक व मतदाराची स्वाक्षरी/अंगठा नोंदविला जाईल.

**निवडणूक साहित्य वितरण :** दिनांक 17 जून २०२६ रोजी सकाळी 9 वाजता बहुद्देशीय सभागृह, जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे साहित्य वितरण होईल. मतदान केंद्राध्यक्षांनी मतपेटी, मतपत्रिका, स्केचपेन, सील, टॅग, मतदार यादी इत्यादी साहित्याची काळजीपूर्वक तपासणी करावी.

**मतदान केंद्रावरील दक्षता :** मतदान केंद्रावर 100 मीटर परिसरात सुरक्षा यंत्रणा राबविण्यात येईल. मतदान पथक व प्रतिनिधींनी गोपनीयतेची शपथ घ्यावी. मतदान केंद्रात मोबाईल, स्मार्टवॉच यांसारखी उपकरणे नेण्यास बंदी असेल. मतदाराने मतपत्रिका दाखविल्यास ती रद्द केली जाईल. यावेळी निवडणूक निरीक्षक श्रावण हर्डीकर यांनी मतदान केंद्रांवर दबाव आणण्याचे प्रकार घडू शकतात, त्यामुळे सर्व पथकांनी सतर्क राहावे, असे निर्देश दिले. मतदान प्रक्रियेत गोपनीयता राखणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवण्याचे आवाहन केले. मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्यांचा योग्य वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

# पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार आषाढी वारी पूर्वी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन व संवर्धन - जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूतीर्चे जतन व संवर्धन करण्यासाठी आज मंदिरात तज्ज्ञ व्यक्तींमार्फत निरीक्षण करण्यात आले. आषाढी यात्रेपूर्वी मूतीर्चे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सल्लामसलत करून निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली.

बैठकीस मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समिती सदस्य, सल्लागार परिषद सदस्य, स्थानिक महाराज मंडळी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, मूर्ती संवर्धन तज्ज्ञ तसेच पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी सांगितले की, भारतातील एकमेव असे मंदिर आहे जिथे भाविकांना पददर्शन घेता येते. मूर्ती दीर्घकाळ टिकावी यासाठी तिचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. वज्रलेप करण्याबाबत तज्ज्ञांनी आपली मते मांडली असून कोणती पद्धत वापरायची याबाबत पुरातत्त्व विभागाचा सल्ला घेऊन दोन ते तीन दिवसांत निर्णय घेण्यात येईल.दररोजच्या नित्योपचारात दही, दूध, मध यांसारख्या पदार्थांचा वापर होत असल्याने मूर्तीच्या आतील बाजूस काही नुकसान झाले आहे का, याची तपासणी करण्यासाठी लायडार स्कॅन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र स्कॅनिंगमुळे मूतीर्ला हानी होऊ शकते का, याचा अभ्यास करूनच निर्णय घेण्यात येईल. यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले की, श्री विठ्ठलाची मूर्ती स्वयंभू असून वारकरी भाविकांचा श्वास आहे. मूर्तीचे जतन व संवर्धन मंदिर समितीमार्फत पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. वज्रलेप करण्यास समितीचा विरोध नाही, मात्र सर्व महाराज मंडळी व तज्ज्ञांच्या सामोपचाराने निर्णय घेतला जाईल.

कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले की, मूर्ती जतन आणि संवर्धनाच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर तसेच राज्य पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सल्लामसलत करून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

बैठकीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित तज्ज्ञ एस. सुब्रमण्यम, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण छत्रपती संभाजीनगरचे उपअधीक्षक डॉ. विनोद कुमार, सेवानिवृत्त अधिकारी विलास मंगीराज, सहाय्यक संचालक डॉ. विलास वाहने, आशीर्वाद ऐरानी, विकास सावंत व महेशाचार्य उत्पात यांनी मूर्ती संवर्धनासंदर्भातील तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती प्राचीन असून पूर्वीपासून नैसर्गिक पद्धतीने वज्रलेपन करण्यात येत होते. हीच पद्धत पुढेही वापरावी, अशी सूचना वीर महाराज यांच्या सह अन्य महाराज मंडळींनी बैठकीत केली.